Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-II FEBRUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# Q.C.I. आणि शिक्षक-शिक्षण संस्थांचे मूल्यांकन व मूल्यनिर्धारण

प्रा.सौ.दीपा अनिल पाटील
नं.ता.वि.स.चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
नंदुरबार.

**प्रस्तावना :**

भारतीय गुणवत्ता परिषदेची ( Quality Council of India) स्थापना १९९७ मध्ये शिक्षण, आरोग्य, उद्योग विविध संस्था तसेच व्यवसाय इ.ची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी झाली. उत्पादित केलेल्या घटकामध्ये कोणतीही कमतरता राहू नये यासाठीचा उत्तम मार्ग म्हणजे गुणवत्तेचे मूल्यांकन व मूल्यनिर्धारण होय.शिक्षक शिक्षण संस्थातील उत्पादित वस्तू (उद्योग क्षेत्रातील भाषेनुसार ) म्हणजे भावी शिक्षक होय. शिक्षक हा भावी पिढीचा शिल्पकार असतो. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी मेरूमणी म्हणून शिक्षकाकडे पाहिले जाते. अशा भावी शिल्पकाराकडे, मेरूमणीमध्ये कोणतीही कमतरता राहू नये यासाठी शिक्षक शिक्षण संस्थांचे मूल्यांकन व मूल्यनिर्धारण भारतीय गुणवत्ता परिषद म्हणजेच QCI करीत आहे.

संपूर्ण भारतात शासकीय, अनुदानीत आणि विना अनुदानीत स्वरुपाच्या शिक्षक-शिक्षण संस्था हजारोच्या संख्येने कार्यरत आहे. प्रत्येक शिक्षक शिक्षण संस्थेला QCI कडून स्वत:चे मूल्यांकन करुन घेणे बंधनकारक आहे. दर्जेदार असलेल्या शिक्षक शिक्षण संस्थांना Top १०० मध्ये स्वत:चे स्थान नोंदवून घेण्यास QCI च्या चिकित्सक परिक्षणास उत्सुक आहेत. तर काही सुस्तावलेल्या शिक्षक-शिक्षण संस्था स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी चिंतेत दिसतात. एकंदरीत भारतातील शिक्षक शिक्षण संस्थांमध्ये QCI च्या परिक्षणाची तयारी सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर श्रेणी अ, श्रेणी ब, श्रेणी क आणि श्रेणी ड विषयक अपेक्षांचा ऊहापोह प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे.

**teachR:**

जून २०१७ मध्ये भारतीय गुणवत्ता परिषदेने मूल्यांकन व मूल्यनिर्धारणाचा आराखडा प्रस्तुत केला आहे. यात एकूण चार पाय-यांनी होणा-या मूल्यमापनाची माहिती देण्यात आली आहे.

पहिली पायरी - महाविद्यालयांना प्राचार्यांच्या आधार कार्ड व पॅन कार्डच्या आधारे रजिस्ट्रेशन करावयाचे असून दीड लाख रुपये शुल्क भरुन स्वयं-मूल्यमापन फॉर्म भरावयाचा आहे. आजच्या तारखेला पहिल्या पायरीची पूर्णता करण्यासाठी दिलेली मुदत संपलेली असून अनेक महाविद्यालयांनी ती पूर्ण केली आहे.

दुसरी पायरी - पहिल्या पायरीत जमा केलेल्या स्वयं-मूल्यमापनाच्या फॉर्मला QCI चे डीए (Desktop assessment) पथक तपासेल. या पथकाला काही त्रुटी आढळल्यास १५ दिवसांची मुदत देऊन त्रुटी नसणारी महाविद्यालये पुढील पायरीसाठी पाठविली जातील तर त्रुटी असलेली महाविद्यालये तात्काळ बंद करण्याचे अधिकार QCI ला आहेत.

तिसरी पायरी - प्रत्यक्ष क्षेत्र पडताळणीची ही पायरी आहे. तिस-या पायरीसाठी पाठवलेल्या महाविद्यालयांना QCI कडून प्रत्यक्ष पडताळणीसाठी भेट देण्यात येईल. स्वयं-मूल्यमापनात दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष भेटीत आढळलेली माहिती यात फरक असल्यास अशी महाविद्यालये बोगस म्हणून QCI कडून घोषित करून बंद केली जातील. याच पायरीवर आजी व माजी विद्यार्थ्यांचे प्रत्याभरण, शालेय शिक्षकांच्या मुलाखती घेऊन प्राप्त माहिती मोबाईल ॲपद्वारे QCI च्या केंद्रिय पथकाकडे पाठविली जाईल.

चौथी पायरी - या पायरीमध्ये महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांची ASK अभिवृत्ती, कौशल्य व ज्ञान यावर आधारित चाचणी घेतली जाणार आहे.

teachR याआराखडयात नमूद केल्याप्रमाणे पुढील चार घटकांचे मूल्यांकन होणार आहे.

१) भौतिक संपदा : ( एकूण - १० गुण ) महाविद्यालयाची उपलब्ध जमिन, इमारत, वर्गखोल्या व इतर सुविधांची उपलब्धता विचारात घेतली जाणार आहे.

२) शैक्षणिक संपदा : (एकूण गुण- २० ) सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांची नोंदणी आधार कार्डसोबत करावयाची आहे. प्राध्यापकांना त्यांच्या अध्यापनाचे घटक नियोजन, शैक्षणिक साहित्य व प्रात्यक्षिकांचे व्हिडीओ महाविद्यालयाला अपलोड करावयाचे आहे. या घटकाचे गुणदान आजी व माजी विद्यार्थ्यांच्या प्रत्याभरणाच्या आधारे केले जाणार आहे. तसेच इंटर्नशीप शाळेतील शिक्षकांचेही प्रत्याभरण गुणदानात विचारात घेतले जाणार आहेत.

३) अध्ययन अध्यापनाची गुणवत्ता : ( एकूण गुण - ३० ) शिक्षक व विद्यार्थी यांच्या वर्गाध्यापनातील ऑडिओ - व्हिडीओ रेकॉर्डच्या आधारे गुणदान होणार आहे.

४) अध्ययन निष्पत्ती : ( एकूण गुण - ४० ) सर्वाधिक गुण असलेल्या या घटकात तीन उपघटकांनुसार मूल्यांकन केले जाणार आहे. i) ASK चाचणीतील निवडक विद्यार्थ्यांचे गुण व अंतर्गत गुण यांची तुलना. ii) मागील दोन वर्षात टीईटी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण, सेवेत रुजू झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि iii) विद्यार्थ्यांच्या पाठांची १० मिनिटांची व्हिडीओ यांनुसार गुणांकन केले जाणार आहे.

अशारितीने वरील चार घटकांना एकूण १०० गुणांमध्ये विभागले आहे. QCI च्या परिक्षणात प्रत्येक घटकाचे आवश्यक पुराव्याचा आधार घेऊन श्रेणी मूल्यांकन होणार आहे. प्रत्येक श्रेणीतील अपेक्षांच्या मर्यादा घटकनिहाय QCI द्वारे सेवापूर्व शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाचे मूल्यांकन व मूल्यनिर्धारण आराखड्यात सादर केल्या आहेत.

**QCI चा सेवापूर्व शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाचे मूल्यांकन व मूल्यनिर्धारण आराखडा : Assessment & Acreditation of Pre-Service Teacher Education Programmes : A Framework**

प्रस्तुत आराखडयात, शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांसंदर्भात तसेच सद्यस्थिती व नजिकच्या काळासाठी राष्ट्रव्यापी शिक्षक निर्माण करण्यासाठी शिक्षक शिक्षण संस्था किती संवेदनशील आहे हा मुख्य हेतू मूल्यांकनाचा आहे हे स्पष्ट होते. शिक्षकाची भविष्यवेधी भूमिका लक्षात घेता छात्रअध्यापकांना संविधानात्मक मूल्यांच्या उपयोजनासाठी सक्षम बनविणे, चिकित्सक, नवज्ञानाचा निर्माता, मार्गदर्शक समुपदेशक, वर्गविविधतेचा व्यवस्थापक, यासारख्या अनेकविध भूमिकांना पूर्ण करणारा सक्षम शिक्षक घडविणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण संस्था या गुणवत्ताप्राप्त असणे देशहितासाठी आवश्यक आहे. यादृष्टीकोनातून शिक्षक प्रशिक्षण संस्थांचे एकूण सात उपविभागांचे मूल्यांकन होणार आहे. प्रस्तुत आराखड्यात प्राथमिक स्तराच्या शिक्षक शिक्षण संस्थांचा उल्लेख असला तरी बी.एड. महाविद्यालयांच्या मूल्यांकनासाठी निश्चित मार्गदर्शक आहेत. प्रस्तुत लेखात प्रमुख तीन विभागांचे विवेचन केले आहे.

१) अभ्यासक्रम विकसन आणि विविधता

शिक्षक प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती NCTE करीत असते. एका मानांकित समितीने सखोल अभ्यासातून तयार केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी विद्यापीठ स्तरावर शिक्षण-प्रशिक्षण संस्थांमधून होत असते. प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी, अभ्यासक्रम रचनेत आवश्यक वाटणारे बदल, नवीन अभ्यासक्रमाचे मूल्यमापन यासंदर्भात शिक्षक-प्रशिक्षण संस्थांनी वेळोवेळी कोणते प्रयत्न केले, त्या प्रयत्नांचे परीक्षण होणार आहे. तसेच नवीन अभ्यासक्रमासंदर्भात प्राध्यापकांमधील आंतरक्रिया, विविध विद्यापीठातील अभ्यासक्रम आणि त्याची होणारी अंमलबजावणी याविषयी शिक्षक-शिक्षण संस्थेने केलेला अभ्यास याचादेखील आढावा परिक्षणात घेतला जाणार आहे. अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी सोबतच सहशालेय उपक्रमांचे होणारे आयोजन, उपक्रमात छात्रअध्यापकांचा सक्रीय सहभाग यांचेही परिक्षण होणार आहे. शिक्षक-शिक्षण संस्थेत प्रवेश घेणारा छात्र अध्यापक वेगवगळया परिस्थितीतून येत असतो. त्याच्या विशेष गरजा, आकलन क्षमता यांचा विचार करून अभिनव पध्दतींचा अवलंब शिक्षक-शिक्षण संस्था करत आहे का ? की पारंपारिक पध्दतीचा अवलंब होत आहे ? तसेच शिक्षक-प्रशिक्षण संस्थांनी, नवीन अभ्यासक्रमाच्या उपयोजनासाठी प्राप्त केलेले संदर्भ, नवीन संदर्भस्त्रोत, स्थानिक गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यासाठी स्वत: आशयनिर्मितीसाठी प्रयत्न याविषयी QCI मल्यांकन करणार आहे.

थोडक्यात, अभ्यासक्रम अभिवृध्दी आणि विविधता या विभागात अभ्यासक्रमाचे मूल्यमापन( Curriculum appraisal ), कर्मचारी सहभाग ( involvement of stakeholders ), अभ्यासक्रम संदर्भ वाढ (curriculum contextualization ), अभ्यासक्रम निर्मात्यासोबत अभ्यासक्रमाविषयी आंतरक्रिया ( Interaction with curriculum developers ), सहशालेय उपक्रम ( co-sochlastic activities ), अभिनव पध्दती ( innovative practices ) इत्यादीचे

मूल्यांकन QCI श्रेणी D - असमाधानकारक, C- समाधानकारक, B - चांगले, आणि A- उत्तम अशा चार श्रेणीत करणार आहे.

श्रेणी D चे निकष : अभ्यासक्रम बदलानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीत कोणत्याही शंका उपस्थित न करता अभ्यासक्रम पूर्ण करणे. शंका असतात, मात्र त्यांचे समाधान करण्यात शिक्षक-शिक्षण संस्था प्रयत्नशील नसते. किंवा अभ्यासक्रमाबद्दल होणा-या चर्चेत क्वचितच सहभाग नोंदविते. सहशालेय कार्यक्रमांचे महत्त्व ओळखून आयोजन होते, परंतू काहीच विद्यार्थी सहभागी होतात.

श्रेणी C चे निकष : अभ्यासक्रम बदलानंतर शिक्षक-शिक्षण संस्थेत अनौपचारिकपणे सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून प्रत्याभरण संस्थेच्या प्रमुखांपुढे मांडतात.अभ्यासक्रम आशयासंदर्भात पुरवणी सादर करतात. इतर विद्यापीठ, इतर राज्याचा अभ्यासक्रम व त्याची अंमलबजावणी कशी होते याचा अभ्यास करण्यास शिक्षक-शिक्षण संस्था प्रोत्साहन देते. विविध क्रिडा व क्रिडेतर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अभ्यासक्रमाचे मूल्यमापन व अभिनव पध्दती वापरासाठी शिक्षकांना प्रोत्साहन दिले जाते.

श्रेणी B चे निकष : संलग्नित संस्थेने अभ्यासक्रम सादर केल्यानंतर शिक्षक-शिक्षण संस्था प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली सहविचार सभेचे आयोजन करते. शिक्षकांमध्ये गटचर्चा आयोजित करून अभ्यासक्रमासंबंधीची मते, निर्णय संबंधित संलग्नित संस्थेला पाठविते. शिक्षकांना विविध अध्ययनस्त्रोत विकासासाठी प्रोत्साहन दिले जाते. अध्ययन स्त्रोताचे केंद्र असलेले ग्रंथालयअभ्यासक्रम अंमलबजावणीसाठी सुसज्ज असावे. नवोपक्रम व अभिनव पध्दतींचा वापर करण्यास स्टाफला मार्गदर्शन व सुविधा प्राप्त करून देणे. तसेच नवोपक्रमांच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील असणे.

श्रेणी A चे निकष : शिक्षक-शिक्षण संस्थेने अभ्यासक्रम बदलासंदर्भात चर्चासत्राचे आयोजन करणे. नवोपक्रम व अभिनव पध्दती यांची निर्मिती करून जर्नल्समध्ये प्रसारित करणे. विविध स्पर्धांचे जिल्हा, विद्यापीठ व राज्यस्तरावर आयोजन करणे.

२) अध्ययन-अध्यापन आणि अध्ययन निष्पत्तीचे मूल्यमापन :

अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रीयेचे योग्यप्रकारे उपयोजन होणे आवश्यक असते. वेगवेगळया सामाजिक, आर्थिक, भौगोलिक विविधतेच्या पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा या भिन्न प्रकारच्या असतात. सक्षम शिक्षक घडविण्यासाठी भिन्नभिन्न गरजांचा विचार करून विशेष अध्यापन पध्दतींचा वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षक-शिक्षण संस्थेने प्राध्यापकांच्या चिकित्सक व सर्जनशील विचारांना चालना देऊन त्यांना व्यवसाय विकासाची संधी उपलब्ध करून द्यावी. तसेच वरिष्ठ श्रेणीसाठी सतत प्रोत्साहन देऊन विविध संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हा अध्ययन-अध्यापन प्रक्रीयेतील अंतर्भूत घटक आहे. विद्यार्थ्यांचे अंतर्गत व बहिर्गत मूल्यामापनातून अध्ययन-अध्यापन प्रक्रीयेची फलनिष्पत्ती कळते. अध्ययन निष्पत्तीसाठी नवोपक्रमांना अध्यापनात अंतर्भूत करणे आवश्यक आहे. थोडक्यात, नवोपक्रम वापरासाठी तसेच नवोपक्रमांच्या निर्मितीसाठी प्राध्यापकांना प्रोत्साहन द्यावे.

वरील विवेचनाचाच एक उपविभाग आंतरवासियतेचा ( internship ) . आंतरवासियता सक्षम शिक्षक घडविण्यासाठी अभ्यासक्रमातील अत्यावश्यक भाग आहे. आंतरवासियता उपक्रमातील पुढील बाबींचे महत्त्वाच्या भागाचे मूल्यांकन होणार होणार आहे. I) Exposure to diverse need & setting - यात भिन्न प्रकारच्या शाळांमध्ये आंतरवासियतेसाठी छात्रअध्यापकांना संधी देणे. II) आंतरवासियतेचे पूर्वीची तयारी (Pre-internship preparation ) III) आंतरवासियता शाळेतील शिक्षकांचा सहभाग ( involvement of teachers of internship ) IV) आंतरवासियता उपक्रमाची देखरेख, पर्यवेक्षण आणि मूल्यमापन ( Monitering, supervision & evaluation of internship ),V) समुदायासोबत आंतरक्रिया (interface with community) आणि VI) अभिनव पध्दती (innovative practices)

अध्ययन अध्यापन आणि मूल्यमापन या भागाचे मूल्यांकन व मूल्यनिर्धारण करण्यासाठी QCI च्या D,C,B आणि A या मापनश्रेणीच्या अपेक्षा पुढीलप्रमाणे -

श्रेणी D : विद्यापीठ परीक्षेच्या दबावामुळे विद्यार्थ्यांच्या भिन्न गरजांकडे दुर्लक्ष होऊन सर्वांना सारखे अध्यापन होते. केवळ एकतर्फी व्याख्यानाचे उपयोजन होते. काही प्रसंगांना विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करून देणे. काहीवेळा चर्चा घडवून आणणे. प्राध्यापकांच्या कमतरतेमुळे आाणि आर्थिक खर्चाच्यादृष्टीने प्राध्यापकांच्या व्यावसायिक विकासाकडे शिक्षक शिक्षण संस्थेने दुर्लक्ष करणे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यामापनाचा भाग म्हणून घटक चाचणीचे आयोजन करणे. विविध

पाठ्यक्रमातील प्रोजेक्ट्स व स्वाध्याय जमा करणे. वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीचे लक्ष्य ठेवून seriously अध्यापन करणे. अंतिम परीक्षेचा (गेल्या तीन वर्षाचा)निकाल समाधानकारक लागणे.

श्रेणी C : भिन्न पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील भिन्न गरजांचा पध्दतशीर अभ्यास करून विशेष अध्ययन अध्यापन प्रक्रीयेचा स्वीकार करणे. स्वयं अध्ययनाचे महत्त्व ओळखणे, पण विद्यापीठ परीक्षेच्या दबावाने त्याचा अतिवापर करणे. विविध चर्चासत्र, परिषदांमध्ये शिक्षकांनी सहभाग घेण्यास शिक्षक-शिक्षण संस्था परवानगी देते. तसेच विद्यार्थी व शिक्षकांच्या अभ्यासाच्या हेतूने चर्चासत्रांचे आयोजन करणे. मूल्यमापन प्रक्रीयेत घटक चाचणी पूर्व परीक्षा यातील प्रश्नांचे तसेच प्रोजेक्ट्स व प्रात्यक्षिक कार्याचे कौशल्यपूर्ण मूल्यमापन करणे. विषय शिक्षकाकडूनच उत्तरपत्रिका आणि प्रात्यक्षिकाचे मूल्यमापन करणे. बहुतांश विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक व परिवर्तन क्षमतेचा विकास होणे. आणि अंतिम परीक्षे विद्यार्थ्यांनी गुणवत्ता प्राप्त करणे.

श्रेणी B : शिक्षकवृंदाने एकत्र येऊन भिन्न पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजांवर चर्चा करून त्यांना अध्ययनशील बनविण्यासाठी उपाययोजनांचा शोध घेणे. एकसंघ मताने उपाय नेमून सतत देखरेख करणे. क्रियाशील अध्ययनाचे महत्त्व ओळखून अध्यापनात वापर करणे. शिक्षकांनी त्यांच्या विषयातील सोयिस्कर असलेल्या संकल्पना, आशय,मुद्दे ओळखून त्यांचा क्रियाशील अध्ययनासाठी वापरणे. शिक्षक-शिक्षण संस्थेत सतत शैक्षणिक वातावरण असते. शिक्षकांना विविध परिषदांमध्ये पेपर सादरीकरणास विशेष प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रात्यक्षिकाचे सादरीकरण करण्यास लावून दोन शिक्षकांच्या टिमने गुणदान करणे. मूल्यमापनात व्यक्तिभेद राहू नये म्हणून मॉडरेशनचा अवलंब करणे. विविध स्पर्धांमध्ये आणि अंतिम परीक्षेमध्ये काही विद्यार्थी अव्वल असावेत.

श्रेणी A : भिन्न पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांचा अध्ययनासंदर्भात विविध प्रदेशात केलेल्या उपाययोजनांचा तुलनात्मक अभ्यास करून स्वत:ची एक कार्यनिती ठरविणे. क्रियाशील अध्ययनाला संस्थेकडून प्रोत्साहन मिळणे. विशेष नितीचा वापर करून विद्यार्थ्याला स्वयं-अध्ययनकर्ता बनविणे, ज्ञाननिर्माता बनविणे. क्रियाशील अध्यानाचे दिग्दर्शन उपलब्ध करणे. शिक्षकांच्या व्यवसाय विकासाशी संबंधित विविध उपक्रमांचे, प्रकाशनाचे आयोजन करणे. विद्यार्थ्यांचे मूल्यमापनासाठी पोर्टफोलिओ अद्ययावत ठेवणे. पोर्टफोलिओच्या मूल्यांकनासाठी Viva-voice test चा अवलंब करणे. यशस्वी अभिनव उपक्रमांना चर्चासत्र आणि जर्नल्समध्ये प्रदर्शित करणे. अंतिम वर्षाचे आणि माजी विद्यार्थी TET परीक्षेत यशस्वी होणे. शिक्षणविषयक चर्चेत सहभागी होणे.

आंतरवासियता उपक्रमाच्या आयोजनाचेदेखील D,C.B आणि A अशा श्रेणीत अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

३) भौतिक व शैक्षणिक सुविधा : शिक्षक-प्रशिक्षण संस्थांसाठी NCTEने निश्चित केलेल्या नियमावलीनुसार क्षेत्रफळ व बांधकाम असणे आवश्यक आहे. नियमानुसार वर्गखोल्यांची संख्या, कार्यालय, सेमिनार हॉल, विविध साधनस्त्रोत केंद्र, प्रयोगशाळा, क्रिडांगण, मुला-मुलींसाठी स्वतंत्र व स्वच्छ प्रसाधन गृह , शुध्द व स्वच्छ पिण्याचे पाणी, वाहनतळ इ.भौतिक सुविधा कार्यरत व अद्ययावत असणे बंधनकारक आहे. इलेक्ट्रिक व ईलेक्टॉनिक्सच्या आवश्यक वस्तू सुस्थितीत असाव्यात. आवार स्वच्छ व निटनेटके असावे.

अनुदेशनासाठी ग्रंथालय, ICT( हार्डवेअर व सॉफ्टवेअर) सुविधा, शालेय अभ्यासक्रमाशी संबंधित विविध विषयांचे साहित्य, खेळाचे साहित्य इत्यादी शैक्षणिक सुविधांचे QCI चिकित्सक परिक्षण करणार आहे. थोडक्यात, i) Infrastructure, ii) Building & Campus, iii) Library resources, iii) ICT Resources, iv) Teaching-Learning Laboratory resources, v) Art & Craft resources, vi) Health & Physical Education resources vii) Amenities like Toilets, Drinking water, Parking facilities, Common Room etc या उपविभागांचे A,B.C आणि D या श्रेणीत पुढीलप्रमाणे चिकित्सक परिक्षण होणार आहे.

श्रेणी D : नियमावलीनुसार जागा आहे, पण आवश्यक सुविधा योग्य नाही. इमारतीची स्वच्छता ठेवण्यासाठी अर्धवेळ सफाई कामगार आहे. दुरुस्तिचे कामकाज सुरू आहे. नियमानुसार पुस्तकसंख्या आहे, पण शीर्षक संख्या कमी. ग्रंथालय एका छोट्या खोलीत आहे. पात्रतापूर्ण ग्रंथपाल नाही. ICT आणि ET सुविधा केंद्रासाठी एका लहान खोली आहे. संगणक कक्ष १० पेक्षा कमी विद्यार्थ्यांसाठी. Internet connectivity अनियमित. सर्व विषयांसाठी एकत्रित अभ्यास प्रयोगशाळा आहे. पाठ्यपुस्तके, शिक्षक मार्गदर्शक, चार्ट्स, मॉडेल्स, विविध विषयांसाठी असलेले साहित्य खोलीच्या वेगवेगळया कोप-याला मांडलेली आहेत. Art & Craft साधनस्त्रोत केंद्रासाठी लहान खोली असून काही साहित्य मांडलेले आहे. वस्तू निर्मितीसाठी लागणारे साहित्य

आणि संगीतासाठी तबला व पेटी उपलब्ध आहे. काही खेळांचे साहित्य उपलब्ध आहे. Indoor खेळासाठी जागा उपलब्ध मात्र Outdoor साठी क्रिडांगण नाही. स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत. पण अपंगांना वेगळयाप्रकारचे प्रसाधनगृहाची उपलब्धता नाही. कॉमन रूम, वाहन तळ आणि अग्नीशमनाच्या सुविधा नाहीत.

श्रेणी C : इमारतीचे बांधकाम, आवश्यक सुविधा नियमाप्रमाणे योग्य आहेत. इमारत बांधकामाची गुणवत्ता समाधानकारक, वर्गखोल्या, व्हरंडा, प्रसाधन गृह इ.च्या स्वच्छतेसाठी पूर्णवेळ सफाई कामगार आहे. शिक्षक-विद्यार्थी कचराकुंडीचा वापर करतात.सांडपाण्याची योग्य व्यवस्था आहे. ग्रंथालय सुविधा पूर्ण आहेत. ICT & ET सुविधादेखील पूर्ण आहेत. CD ROMs पुरेश्या प्रमाणात आहेत.आवश्यक तेव्हा internet connectivity उपलब्ध आहे. विज्ञान-गणितासाठी एक आणि भाषा व सामाजिक शास्त्रासाठी एक अशा दोन curriculum lab आहेत. Art & Craft साठी एक वर्गखोली असून त्यात Craft, visual Arts आणि Performing Arts असे तीन विभाग आहेत. Health & Physical Educationसाठी वर्गखोली उपलब्ध असून Indoor खेळाच्या सुविधा उपलब्ध आहेत. सतत स्वच्छ असलेली प्रसाधनगृहे विद्यार्थी व कर्मचा-यांसाठी आहेत. कॉमन रूममध्ये आवश्यक फर्निचर आहे. अग्नीशमनाच्या काही सुविधा उपलब्ध आहेत.

श्रेणी B : शिक्षक-शिक्षण संस्थेचे मोठे व सर्व सुविधांनी परिपूर्ण कँपस आहे. स्वतंत्र विषयाच्या स्वतंत्र प्रयोगशाळा असून अद्ययावत आहेत. Art & Craft साठी विशेष सुविधा आहेत. इमारतीची देखभाल काळजीपूर्वक व काही दुरूस्ती असल्यास तात्काळ होते. ग्रंथालय विविध विभागांमध्ये विभागलेले आहे. ग्रंथ देवाण-घेवाणीच्या अद्ययावत पध्दतींचा वापर होतो. पुरेसे ग्रंथ ग्रंथालयात आहेत. ICT केंद्राचे व्यवस्थापन पात्र व्यक्ती ( instructer) करते. आदर्श अभ्यासक्रम प्रयोगशाळा आहे. कला शिक्षक Art & Craft चे व्यवस्थपन करतात. योगा शिक्षक असून, क्रिडाप्रकारांचे सर्व साहित्य व क्रिडांगण उपलब्ध आहे. प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याच्या प्रगत सुविधा आहेत. स्वस्त दरात नास्ता मिळण्याची सुविधा आहे.

श्रेणी A: ऑडिटोरियम,स्टेडियम, थिएटर, हॉस्टेल, डायनिंग हॉल, स्टाफ क्वार्टर यासह उच्च दर्जाच्या इमारत सुविधा आहेत. संगणीकृत ग्रंथालय, ग्रंथालय नियमावलीचे गांभीर्याने पालन होते. ग्रंथालय समितीद्वारा नवीन पुस्तकांची खरेदी होते. विद्यार्थ्यांना पाठ टाचणापासून ते प्रोजेक्ट पर्यंत पुरेशी internet सुविधा प्राप्त होते. पाठ टाचणासाठी अभ्यासक्रम प्रयोगशाळेचा पूर्ण वापर विद्यार्थी करतात. Art & Craft साठी सुसज्ज असे स्वतंत्र केंद्र उपलब्धआहे. प्रत्येक विद्यार्थी खेळात सहभागी होतो. विविध स्पर्धांचे आयोजन आणि सक्रीय सहभाग शिक्षक-शिक्षण संस्था घेते. पूर्ण वेळ असलेला Para medical staff असलेली अद्ययावत Seek room आहे. स्वस्त दरात गुणवत्तेचे जेवण देणारी स्वच्छ व व्यवस्थित कँटिन आहे.

अशाप्रकारे QCI च्या अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी प्रत्येक शिक्षक-शिक्षण संस्थेला सतत प्रयत्नशील रहावे लागणार आहे.

संदर्भ :

1. Ncte-india.org
2. Ncte-india.org>Accreditation-Framework
३. शिक्षक-प्रशिक्षणाचे नवे मूल्यांकन, लोकसत्ता, जुलै १२,२०१७.